0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि. ११/०६/२०११ रोजीचा अहवाल व दिनांक ०७/०७/२०११ च्या पत्रान्वये प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४४/२०११/जा.५५०, दि.११/०७/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन यांचे दि.२०/०७/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) गणेश लक्ष्मी बोटीचे मालक प्रणाम दिलीप कोळी, नंदकिशोर यशवंत पटेकर, मंगेश सदानंद झरवे, संदीप यशवंत आजगोलकर, राजेश नामदेव पालशेतकर, प्रितम भार्गव धातकर, भार्गव तुकाराम किल्लेकर, देवेंद्र यशवंत कटनाक, गणपत भागोजी पालशेतकर, पांडूरंग बाबाजी बासावे, हेमंत सिताराम नाटेकर, कृष्णा राजाराम किल्लेकर व नंदकुमार शंकर फणसकर यांचे दिनांक २०/०७/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

५) करंजा मच्छिमार वि.का.स.सोसायटी यांचे दि.२५/०७/२०११ रोजीचे पत्र.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४४/२०११/जा ५८३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २८/०७/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०१/०६/२०११ रोजी यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांना गोपनीय माहिती मिळाल्यावरुन तेथील अधिकारी पथक पुर्णा हि पोलिस नौका घेऊन बार्ज परिसरात मुंबई बंदर या ठिकाणी गस्त घालत असतांना अधिकाऱ्यांना माहिती मिळाल्याप्रमाणे संशयित "गणेश लक्ष्मी " हि मच्छिमार नौका तेथे आल्यावरुन त्यास पोलिस अधिकाऱ्यांनी थांबवून बोटीमध्ये काय आहे असे विचारले असता, ते नीट उत्तरे देत नव्हते. म्हणून जास्तच संशयित वाटल्याने सदरची बोट हि बोट गेट येथील चांभार गोदी, मुंबई या ठिकाणी घेवून आले.

पोलिस अधिकाऱ्यांनी सदर ठिकाणी दोन पंचास बोलावून सदर बोटीची पंचासमक्ष तपासणी केली असता, बोटीवर पत्र्याची दोन हजार लिटरची एक टाकी तसेच सिंटेक्सची २ हजार लिटरची एक व एक हजार लिटरची एक

टाकी दिसून आली. सदरच्या तीनही टाक्या अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष तपासल्या असता, त्यात डिझेल असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना समजले. सदर डिझेलचा अधिकाऱ्यांनी हात घालून वास घेतला असता तो डिझेल सारखा वास येत होता. सदरचे डिझेल हे अंदाजे ४००० लिटर एवढे असून त्याची किंमत अंदाजे १,६०,०००/- रुपये आहे. तद्नंतर वरील डिझेल बाबत बोटीवरील हजर असणाऱ्या इसमाना सदर डिझेल जवळ बाळगण्याचे कारण विचारले असता, ते काही सांगू शकले नाहीत. तसेच डिझेलबाबत पावती किंवा कागदपत्रे देखील सादर करु शकले नाहीत.

पोलिसांनी वर नमूद बोटीवरील काम करणारे इसम नामे १) नंदकिशोर यशवंत पटेकर २) मंगेश सदानंद झरवे ३) संदीप यशवंत आजगोलकर ४) राजेश नामदेव पालशेतकर ५) प्रितम भार्गव धातकर ६) भार्गव तुकाराम किल्लेकर ७) देवेंद्र यशवंत कटनाक ८) गणपत भागोजी पालशेतकर ९) पांडूरंग बाबाजी बासावे १०) हेमंत सिताराम नाटेकर ११) कृष्णा राजाराम किल्लेकर व १२) नंदकुमार शंकर फणसकर (तांडेल) यांना ताब्यात घेतले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत करुन बेकायदेशिररित्या डिझेल (ज्वलनशिल पदार्थ) विक्रीसाठी जवळ बाळगून गणेश लक्ष्मी बोटीवर बेकायदेशिर व अनधिकृतपसणे साठा तसेच वाहतूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द भा. द. वि. चे कलम २८५, ३४ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २२/२०११, दि.०१/०६/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | "गणेश लक्ष्मी " नावाची लाकडी मच्छिमार बोट | १ नग | २५,००,०००/- |
| २ | सदर बोटीमधील डिझेलचा साठा | ४००० लिटर | १,६०,०००/- |
| | | एकूण | २६,६०,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २०/०७/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री एम. बी. चिपकर उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे लेखी अभिवेदन सादर केले.

तसेच दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस गणेश लक्ष्मी बोटीचे मालक प्रणाम दिलीप कोळी, नंदकिशोर यशवंत पटेकर, मंगेश सदानंद झरवे, संदीप यशवंत आजगोलकर, राजेश नामदेव पालशेतकर, प्रितम भार्गव धातकर, भार्गव तुकाराम किल्लेकर, देवेंद्र यशवंत कटनाक, गणपत भागोजी पालशेतकर, पांडूरंग बाबाजी बासावे, हेमंत सिताराम नाटेकर, कृष्णा राजाराम किल्लेकर व नंदकुमार शंकर फणसकर हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

सुनावणीच्या वेळी उपस्थित बोटीचे मालक यांनी करंजा मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, कुलाबा यांचेकडून खरेदी केलेल्या डिझेलची बिले सादर केली. सबब, सदर बिलांची खातरजमा करण्याकरिता करंजा मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेडचे अध्यक्ष/सचिव यांना मुळ पावती पुस्तक व विक्री पुस्तक दि. २५/०७/२०११ रोजी तपासणीसाठी सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले.

दिनांक २५/०७/२०११ रोजी करंजा मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेडच्या वतीने श्री. शिवाजी विठ्ठल मेघाने व श्री. सिध्देश्वर वासुदेव नाखवा हे प्राधिकार पत्रासह उपस्थित राहिले व त्यांनी मुळ पावती पुस्तक व विक्री पुस्तक वाचावे क्र. ५ अन्वये तपासणीसाठी सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक यांनी युक्तीवाद केला की, सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या गणेश लक्ष्मी या बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशील असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व मानवी जिवितास पोहचण्याच्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केली. तसेच बोटीवर हजर असणाऱ्या इसमांना सदरचे डिझेल जवळ बाळगण्याचे कारण विचारले असता ते काहीही सांगू शकले नाही. तरी या बाबीचा विचार करुन जप्त केलेला सर्व मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे योग्य ते आदेश होणेस विनंती करुन तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गणेश लक्ष्मी बोटीचे मालक प्रणाम दिलीप कोळी यांनी युक्तीवाद केला की, ते गणेश लक्ष्मी या मच्छिमार बोटीचे मालक असून त्याबाबतची कागदपत्रे त्यांच्याकडे आहेत. सदरची बोट मच्छीमारीकरीता खोल समुद्रात १५-२० दिवस-रात्र समुद्रातच असते. त्याकरिता त्यांना जास्त डिझेलची आवश्यकता असते. मासेमारीकरीता जायचे असल्याने डिझेलपंपावरुन डिझेल आणण्याबाबत तांडेल यांना सांगीतले. त्याप्रमाणे तांडेल यांनी डिझेलपंपावरुन टाकीमध्ये ३००० लिटर डिझेल आणून बोटीमध्ये भरले.

तसेच आधीचे ५००-६०० लिटर डिझेल बोटीत शिल्लक होते. त्यांनतर नेहमीप्रमाणे मांसेमारीला जाण्याची तयारी करीत असतांना पोलीसांनी त्यांना पकडले. पोलीसांनी जप्त केलेले डिझेल हे त्यांनी डिझेलपंपावरुनच घेतले असून, त्याबाबतची बिल त्यांच्याकडे आहेत. पत्र्याची टाकी लिकेज असल्याने सदरचे डिझेल सिन्टेक्स टाकीमध्ये घेतले. पोलीसांनी संशयावरुन त्यांना पकडून त्यांच्यावर गुन्हा नोंदविला आहे. बोट जप्त केल्यापासून मासेमारीच्या धंद्यावर परिणाम झाला आहे. परिणामी त्याचे व बोटीतील १६ खलाशी तसेच ४ मजूर यांना कुटूंबाचा जीवनमान चालविणे कठीण झाले आहे. तसेच मच्छिमार धंद्यासाठी काढलेले कर्ज फेडणे अशक्य होणार आहे. सदरच्या बोटीची किंमत रुपये २५,००,०००/- दाखविली आहे. ती पूर्ण चूकीची आहे. कारण सदरची बोट दिनांक २०/०७/२००७ रोजी रुपये २,३०,०००/- ला विकत घेतली होती. बोट १८ वर्ष जुनी असल्या कारणारे पावसाचे पाणी व समुद्राचे पाणी साचून बोटीतून एक दिवस जरी पाणी काढले नाही तर बोटीला जलसमाधी मिळू शकते. तरी त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नसल्याने जप्त केलेली बोट व डिझेल परत मिळावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित संदीप यशवंत आजगोलकर, राजेश नामदेव पालशेतकर, प्रितम भार्गव धातकर, भार्गव तुकाराम किल्लेकर, गणपत भागोजी पालशेतकर, पांडूरंग बाबाजी बासावे, हेमंत सिताराम नाटेकर, कृष्णा राजाराम किल्लेकर यांनी युक्तीवाद केला की, गणेश लक्ष्मी या बोटीवर ते खलाशी म्हणून काम करतात. ते बोटीवर पगारी नोकर नसून भागधारक आहेत. या बोटीचे मालक श्री. प्रणाम दिलिप कोळी हे आहेत. ते या बोटीतून मच्छीमारीकरीता खोल समुद्रात जात असतात. त्यांकरीता त्यांना जास्त डिझेलची आवश्यकता असते. कारण बोट १५ ते २० दिवस-रात्र खोल समुद्रातच असते. बोटीच्या मालकाने सांगीतल्याप्रमाणे ते बोटीवर काम करतात. त्यामुळे बोट मालकाने बोटीमध्ये डिझेल कोठून आणले हे त्यांना माहित नाही. डिझेल आणण्याचे काम तांडेल करतात. मासेमारीला जाण्याची तयारी करत असताना, पोलिसांनी पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. बोट जप्त केल्यापासून त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालविणे अशक्य झाले आहे. तरी पोलीसांनी जप्त केलेली बोट व डिझेल परत द्यावे, अशी विनंती करुन तसे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नंदकिशोर यशवंत पटेकर, मंगेश सदानंद झर्वे, देवेंद्र यशवंत कटनाक, नंदकुमार शंकर फणसकर यांनी युक्तीवाद केला की, गणेश लक्ष्मी या बोटीवर ते तांडेल म्हणून काम करतात. ते बोटीवर पगारी नोकर नसून भागधारक आहेत. या बोटीचे मालक श्री. प्रणाम दिलिप कोळी हे आहेत. हि बोट ते मच्छीमारीकरीता खोल समुद्रात नेत असतात. त्यांकरीता त्यांना जास्त डिझेलची आवश्यकता असते. कारण बोट १५ ते २० दिवस-रात्र खोल समुद्रात मच्छिमारीकरिता असते. मासळी विक्री झाल्यानंतर बोट मालकाने पंपावरुन डिझेल आणण्याबाबत त्यांना सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी पंपावरुन टाकीमध्ये

३००० ते ४००० लिटर डिझेल आणून बोटीमध्ये भरले. तसेच आधीचे ५०० ते ६०० लिटर शिल्लक होते. मासेमारीला जाण्याची तयारी करत असताना, पोलिसांनी पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. बोट जप्त केल्यापासून त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. तरी पोलीसांनी जप्त केलेली बोट व डिझेल परत मिळावे, अशी विनंती करुन तसे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि. ०१/०६/२०११ रोजी यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी पोलिस नौका घेऊन बार्ज परिसरात मुंबई बंदर या ठिकाणी गस्त घालत असतांना माहिती मिळाल्याप्रमाणे संशयित "गणेश लक्ष्मी " हि मच्छिमार नौका तेथे आल्यानंतर सदर बोट चांभार गोदी, मुंबई या ठिकाणी आणून सदर बोटीची पंचासमक्ष तपासणी केली असता, बोटीमध्ये असलेल्या तीन टाक्यामध्ये डिझेल असल्याचे आढळून आले. सदर डिझेलबाबत बोटीवर उपस्थित इसमास विचारणा केली. तथापी, डिझेलबाबत पावती किंवा कागदपत्रे सादर करु शकले नाहीत. त्यानुसार सदर बोट व त्या बोटीमधील डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

बोटीचे मालक प्रणाम कोळी यांनी सुनावणीचेवेळी दिलेल्या निवेदनात, त्यांना १५ ते २० दिवस-रात्र खोल समुद्रात मच्छिमारीसाठी जाण्याकरिता जास्त डिझेलची आवश्यता असल्याने डिझेलपंपावरुन सिन्टेक्स टाकीमध्ये ३००० लिटर डिझेल आणून बोटीमध्ये भरले. तसेच आधीचे ५००-६०० लिटर डिझेल बोटीत शिल्लक होते. पत्र्याची टाकी लिकेज असल्याने सदरचे डिझेल सिन्टेक्स टाकीमध्ये घेतले असल्याचे नमुद करुन दिनांक १८/०५/२०११ रोजी १००० लिटर व दिनांक ०१/०६/२०११ रोजी ३००० लिटर डिझेल करंजा मच्छिमार वि.का.स. सोसायटी, कुलाबा यांचेकडून खरेदी केल्याची बिले सादर केली आहेत.

पत्र्याची टाकी लिकेज असल्याने सदरचे डिझेल सिन्टेक्स टाकीमध्ये घेतले व ते बोटीमध्ये भरले असल्याचे बोट मालकाने खुलासा केला असला तरी, एका लोखंडी टाकीमध्ये तसेच दोन सिन्टेक्सच्या टाकीमध्ये डिझेल साठा असल्याचे घटनेच्या वेळी केलेल्या पंचनाम्यात नमुद केले आहे. वस्तूत: सदर बोट मालकाचा मासेमारीचा व्यवसाय असल्याने, त्यांनी दिनांक १८/०५/२०११ रोजी १००० लिटर डिझेल खरेदी केल्यानंतर बोट समुद्रात मासेमारीकरिता

नेली असणारच व त्यामुळे काही प्रमाणात डिझेलचा वापर होऊन डिझेल साठा कमी होणे अपेक्षित आहे. तथापी, घटनेच्या वेळी सदर बोटीमध्ये ४००० लिटर डिझेल साठा तीन स्वतंत्र टाक्यांमध्ये असल्याचे पोलीसांना आढळून आले आहे. त्याचप्रमाणे सदरची घटना दिनांक ०१/०६/२०११ रोजी सकाळी १०:०० वाजता घडलेली असून, बोट मालकाने दिनांक ०१/०६/२०११ रोजी डिझेल खरेदीबाबतची जी पावती सादर केली आहे, त्याबाबत डिझेल विक्री केल्याची मुळ नोंदवही पडताळली असता, त्यात विक्रीची वेळ नमुद केलेली नसून सदर बोट मालकाने डिझेल खरेदी केल्याची नोंद शेवटी असल्याचे दिसून आले. यावरुन सदरचे जप्त केलेले डिझेल हे त्यांनी सादर केलेल्या पावतीनुसार डिझेल पंपावरुन घेतले असल्याबाबत साशंकता निर्माण होते. मात्र सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तूस्थितीवरुन सदरचा जप्त केलेला डिझेलचा साठा गैरमार्गाने मिळविला असल्याचे दिसून येते. तसेच पोलीसांनी केलेल्या खुलाशात, सदर बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व मानवी जिवितास पोहचण्याऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केली असल्याचे नमुद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून मा.न्यायालयात याबाबत सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेली गणेश लक्ष्मी बोट ही प्रणाम दिलीप कोळी यांचे मालकीची असून, सदरची बोट रजिस्ट्रार ॲण्ड पोर्ट ऑफिसर, मोरा ग्रुप ऑफ पोर्ट, ठाणे यांचे कार्यालयाकडे नोंदणी क्र. एमएच/एफ/एमओआर/०४/०२९०९, दि. ११/०३/१० अन्वये नोंदणीकृत असल्याचे प्रणाम दिलीप कोळी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनात, बोट जप्त केल्यापासून मासेमारीच्या धंद्यावर परिणाम झाला आहे. परिणामी त्याचे व बोटीतील १६ खलाशी तसेच ४ मजूर यांना कुटूंबाचा जीवनमान चालविणे कठीण झाले आहे. तसेच मच्छिमार धंद्यासाठी काढलेले कर्ज फेडणे अशक्य होणार असल्याचे नमुद केले आहे. तसेच पोलीसांनी सुनावणीच्यावेळी दिलेल्या अभिवेदनात, सदर गणेश लक्ष्मी या बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला असल्याचे नमुद केले आहे. यावरुन बोट मालकाने जाणीवपुर्वक गैरमार्गाने मिळविलेल्या डिझेलची साठवणूक करण्याकरीता उक्त गणेश लक्ष्मी बोटीचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तथापि, सदर बोटीच्या व्यवसायावरच त्यांच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे व मच्छिमार धंद्यासाठी काढलेले कर्ज फेडणे अशक्य होणार आहे ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्र. जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ना.पु.२३, दि. ३० ऑगष्ट, २००५ मधील

निर्देशानुसार सदरची जप्त करण्यात आलेली बोट ही तीच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर बोटीचे मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २२/२०११, दि.०१/०६/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) जप्त करण्यात आलेली "गणेश लक्ष्मी" नावाची लाकडी मच्छिमार बोट तीच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर तीच्या मालकास परत करण्यात यावी.

२) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी बोट मालकाची राहील.

३) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू बोट विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

४) तथापी, या बोटीच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर बोटीची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण डिझेलचा साठा (४००० लिटर) पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0008 वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) नंदकिशोर यशवंत पटेकर
२) मंगेश सदानंद झरवे
३) संदीप यशवंत आजगोलकर
४) राजेश नामदेव पालशेतकर
५) प्रितम भार्गव धातकर
६) भार्गव तुकाराम किल्लेकर
७) देवेंद्र यशवंत कटनाक
८) गणपत भागोजी पालशेतकर
९) पांडूरंग बाबाजी बासावे
१०) हेमंत सिताराम नाटेकर
११) कृष्णा राजाराम किल्लेकर
१२) नंदकुमार शंकर फणसकर (तांडेल)
१३) "गणेश लक्ष्मी " नावाच्या लाकडी मच्छिमार बोटीचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

E:\Ammaldata\Ammal Aadesh\Aadesh.doc